# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर
# स्वातंत्र्य - समता - बंधुता चे जनक

भारतरत्न डॉ. भिमराव रामजी उर्फ बाबासाहेब आंबेडकर हे संपूर्ण जगात भारतीय घटनेचे शिल्पकार म्हणून पूजनीय आहेत. आणि ह्या घटना शिल्पकाराबद्दल भारतीय जनतेच्या मनात सर्वाधिक आदर आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांबद्दल आपले वैयक्तिक मत प्रदर्शित करताना प्रत्येक जण ह्या व्यक्तीमत्वाची तुलना हिमालयापेक्षा जास्त उंचीच्या कर्तृत्वाशी करतो. म्हणजेच ज्या महामानवाने रात्रंदिवस परिश्रम व अभ्यास करून भारताची घटना तयार केली व ह्या घटनेमध्ये स्वातंत्र्य, समता व बंधुत्वाचा अविष्कार करण्यात आलेला आहे. **प्रत्येकास निवडणुकीत एका मताचा अधिकार** या मुलभूत तत्वप्रणालीवर भारतीय लोकशाही उभे करण्याचे काम डॉ. आंबेडकरांनी केलेले आहे.

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते काकासाहेब गाडगीळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या घटनापुर्तीच्या नंतरच्या कालावधीत अभिमानाने लोकांना सांगायचे की, ‘‘ **लोकहो आता तुम्ही राजे झालेले आहात. तुम्हा प्रत्येकाला सार्वत्रिक निवडणुकीमध्ये एका मताचा अधिकार प्राप्त झालेला आहे.** लुळा, पांगळा, विश्वदारिद्राने पछाडलेला, दुर्लक्षित, विकलांग, समाजात पत नसलेला सर्व सामान्य माणूस व दुसऱ्या बाजूस टाटा - बिर्ला - अंबानी - किर्लोस्कर - राजकारणी - आजी - माजी सत्ताधिश व करोडो रूपये जनतेचे लूट करणाऱ्या लोकांना एकाच तराजूत तोलण्याचे अभूतपुर्व काम ह्या घटना शिल्पकाराने केले. **भारतातील लोकशाही ही जगातील सर्वात मोठी लोकशाही आहे.** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची घटना कुठलाही कायदा हातात न घेता, कोणालाही प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष न पिडता तसेच कुठलीही रक्तरंजीत घटना न घडविता सर्वसामान्यांचा विजय घडवून आणणारी घटना म्हणजे ‘‘ दर पाच वर्षांनी सार्वत्रकि निवडणुक घेणे व त्यासाठी जनतेने आपल्या एका मताच्या अधिकारातून राज्यकर्ता ठरविणे ’’ हा चमत्कार घडविण्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे फार मोठे योगदान व अनंत उपकार भारतावर आहेत.

डॉ. आंबेडकरांनी भारताची घटना संपूर्ण देशासाठी व देशातील संपूर्ण जनतेसाठी अस्तित्वात आणली. **केवळ दलित जनतेसाठी या घटनेची निर्मिती झालेली नाही.** परंतु दलित मागासवर्गीय जनतेस न्याय देण्यासाठी, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संपूर्ण भारत देशाचे कल्याण करून, देशासाठी घटना लिहून देशातील प्रत्येक नागरिकाचा सन्मानच केलेला आहे. **‘‘शिका, संघटीत व्हा, संघर्ष करा ’’** हा संदेश डॉ.आंबेडकरांचाच. कारण त्यांना हे ही माहीत होते की, भारत देशात संघर्ष केल्याशिवाय सर्वसामान्य जनतेच्या हातात काही पडणार नाही. आणि त्यासाठी शिक्षण घेणे आवश्यक आहे. अज्ञानाने व चुकीच्या माहितीवर स्वार्थापोटी संघर्ष करणे डॉ. आंबेडकरांना अभिप्रेत नव्हते. म्हणून प्रत्येकाने शिकले पाहिजे व शिकून संघटीत झाले पाहिजे. न शिकता संघटीत लोक होत असल्यामुळे भारतातील अनेक पापी लोकांनी जनतेला वेठीस धरलेले आहे. **डॉ. बाबासाहेबांची आठवण पुण्यतिथी व जयंतीच्या दिवशीच तथाकथित समाज सुधारकांना व लोक प्रतिनिधींना होत असते.** त्याशिवाय डॉ. बाबासाहेबांच्या नंतर समता, स्वातंत्र्य व बंधुत्व याचा राजरोसपणे रोज मुडदा पाडला जातो. व आम्ही सर्वजण ह्या ना त्या कारणाने निमूटपणे सहन करत आहोत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना सर्वात महनीय देशभक्त म्हणण्यामध्ये फार मोठी पार्श्वभूमी त्यापाठीमागे

होती. परंतु आज लोकसभा, विधानसभा व इतर संबंधित निवडणुका जिंकण्यासाठी **एकेका मताला पन्नास-पन्नास लाख रूपये ज्या देशात मोजले जातात त्या देशात समता कशी राहू शकते** ? ज्या देशात व ज्या **महाराष्ट्र राज्यात सहकार कायदा दोन वेगवेगळ्या माणसांसाठी / संस्थेसाठी वेगळा वापरला जातो तेथे समता राहिली कुठे** ? **ज्यांनी कायदे करायचे व ज्यांनी कायद्याची अंमलबजावणी करायची,** त्यांनीच शेतकरी, कष्टकरी यांना पुढे करून जनतेचेच करोडो रूपये **रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, नाबार्ड व शासनाच्या माध्यमातून चाणाक्ष्य बुध्दीने लुटायचे, अनुदाने प्राप्त करून घ्यायची, पॅकेजेस् घ्यायची**, हे केवळ **सहकारी साखर कारखाने** यांच्यासाठी ह्या राज्यात कामकाज चालू आहे. राज्यातील बँका व पतसंस्था, महिला व बेरोजगारांच्या सहकारी संस्था यांचेसाठी मात्र डॉ. बाबासाहेबांना अभिप्रेत असलेली समता लागू केली जात नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जर आज हयात असते तर त्यांनी स्वत: लिहीलेल्या घटनेतील तरतुदी धाब्यावर बसवणाऱ्यांना जेलमध्ये डांबून प्रत्येकाने जनतेचे वेगळ्या माध्यामतून लाटलेले करोडो रूपयेसुध्दा जप्त करून संपूर्ण देशावर व सर्वसामान्य जनतेवर उपकार केले असते. परंतु दुर्दैवाने दुसरे डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मा. ज्योतिबा फुले भारतात उदयास येण्याची कुठेही सुतराम शक्यता दिसत नाही.

**ज्यांनी न्याय द्यायचा तेच पैशाच्या सामर्थ्यावर सर्वांना विकत घेत आहेत**. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहीलेली घटना समतेवर आधारीत असताना, सत्ता आणि पैशाच्या जीवावर संबंधित लोक कोणालाही घाबरत नाहीत. **कुठलीही नोकरी, एखादा कारखाना व सुस्थितला व्यापार न करता** समाजातील तथाकथित समाज सुधारक व व्यवस्थेचे तथाकथित मालक यांचेकडे एकेका निवडणुकीत शंभर कोटी रूपयांपेक्षा जास्त रक्कम खर्च करण्याची क्षमता आली कुठून ? आमदारकीच्या निवडणुकीत पन्नास ते साठ कोटी रूपये खर्च करणारे तथाकथित व्यवस्थेचे बनावट सेवक एवढी रक्कम कुठून आणतात ? याचा विचार करायला सुध्दा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहलेल्या घटनेशी ईमान ठेवणाऱ्यांना व्यवस्थेने सुस्थितीत ठेवले नाही. अन्यथा महाराष्ट्र राज्यातील पतसंस्थांनी वाटलेल्या कर्जाची वसुली करण्यासाठी शासनाने केव्हाच योजना आखली असती. कारण **हे करण्यास शासनाकडे वेळ नाही**. आणि पतसंस्थांनी वाटलेल्या कर्जाच्या वसुलीची वस्तुस्थिती लक्षात न घेता किरकोळ प्रमाणात ठेवी परत दिल्या नाहीत म्हणून पतसंस्था व त्या मध्ये काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचा पंचनामा करण्यामध्येच सरकार व त्यांचे संबंधीत दलाल कार्यरत असल्याचे सतत जाणवत आहे.

पतसंस्था ही सर्वसामान्य कार्यकर्त्यांची व सर्वसामान्य जनतेची सहकारी चळवळ आहे. पतसंस्थांचे लेखापरिक्षण शासनाने बँकांना आकारल्या जाणाऱ्या शुल्कात करणे आवश्यक आहे. व तो अधिकार कायद्याने सरकारला दिलेला आहे. सरकारने स्वत:च्या तिजोरीतून पतसंस्थांचे ऑडीट करणे आवश्यक आहे. शासनाला हा निर्णय एकदा घ्यावाच लागणार आहे. त्याचवेळी या पतसंस्था व त्यामध्ये काम करणारे कार्यकर्ते काय असतात व त्यांचे यामध्ये किती मोठे योगदान आहे हे सरकारला त्याचवेळी समजेल. पतसंस्थांना ऑडीटच्या नावाखाली कोंडीत पकडणारे व ऑडीट फी च्या नावाखाली पतसंस्थांना लुटणारे आपोआप उघडे पडतील आणि त्याचवेळी उपविधी व सहकार कायदा याचे उल्लंघन पतसंस्था काही व्यवहारी अपवाद सोडले तर पतसंस्था करीत नाहीत, हेच लक्षात येईल. **तसेच ऑडीटची वर्गवारी हे नाटक प्रथम थांबविणे आवश्यक आहे**. त्याचवेळी समानतेचा गजर व पतसंस्थांना लुटणाऱ्यांचा समूळ नायनाट हो डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मूळ तत्वप्रणालीनेच उदयास येईल.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!